ROTARY CLUB OF KOLHAPUR

RI District 3170 | Club No. : 15655 | Charter No. : 5685 | Charter Date. : 01-11-1943

# ROTARY HERALD


WEEKLY BULLETIN 2026-27

DATE : 9 July 2026

## JULY : MATERNAL & CHILD HEALTH MONTH

### The Begining of Rotary Year

### Shri Ganesha



We may take this Inspiration from Lord Ganeshjee

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **Big head** | ----- | says | -------- | **Think Big** |
| **Narrow eyes** | ------ | point out | -------- | **Deep concentration** |
| **Long nose** | ------ | Says | ------- | **Learn Long lastingly** |
| **Big ears** | ----- | says | -------- | **Listen More** |
| **Small mouth** | ----- | tell us | ------- | **Speak less** |




Driving **Innovation** and **Growth** for **Better Future**

**RTN. DR. LENNY DA COSTA**
DISTRICT GOVERNOR 2026-27

**RTN. OLAYINKA BABALOLA**
R I PRESIDENT 2026-27

**RTN. HARSHAD DHALE**
CLUB SECRETARY 2026-27
rtn.harshad3170@gmail.com

**RTN. PRADEEP PASMAL**
CLUB PRESIDENT 2026-27
rtn.pradeep3170@gmail.com

**RTN. NILESH KUTTE**
JT. BULLETIN EDITOR
nilesh.kutte@gmail.com

**RTN. SANJEEV CHIPLUNKAR**
BULLETIN EDITOR
kalakalpana.advt@gmail.com

Bulletin Issue No: 01

0231-2651444
www.rotarykolhapur.org
Instagram : rotarykolhapur

# ५२ नव्हे ५३ आठवड्यांच्या प्रवासाची सुरूवात



रो.निलेश कुत्ते
जॉईंट बुलेटिन एडिटर



रो.संजीव चिपळूणकर
बुलेटिन एडिटर

१ जुलै, रोटरीसाठी change over day जगभर सर्वत्र ३० जूनला रात्री १२ वाजता आपोआप ही प्रक्रिया घडते. सर्व पदाधिकारी एका क्षणात बदलले जातात. इन्स्टॉलेशन किंवा अधिकार ग्रहण हा केवळ एक समारंभ ! पण हा बदल ठराविक त्या क्षणालाच घडतो.

या प्रक्रियेनुसार १ जुलै ही आपली बुधवारची पहिली मिटींग अध्यक्ष या नात्याने रो.प्रदीप पासमल व सेक्रेटरी या नात्याने रो.हर्षद ढाळे यांनी घेतली. या वर्षी आणखी एक योगायोग म्हणजे १ जुलैला वर्षाच्या पहिल्या दिवशी बुधवार होता तसाच ३० जून २०२७ म्हणजे वर्षाच्या शेवटच्यां दिवशीही बुधवारच आहे. त्यामुळे या वर्षाच्या प्रेसिडेंट, सेक्रेटरींना ५२ ऐवजी ५३ मिटींग्ज मिळणार आहेत. खऱ्या अर्थाने संपूर्ण वर्ष काम करण्याची ही संधी आहे. अर्थातच आम्हालाही थोडं अधिक काम करावं लागणार आहे.

Involvement हा रोटरीसाठी कायमपणे परवलीचा शब्द आहे. सर्वांच्या सहभागानेच उत्तम काम करता येते हे रोटरीचे तत्व आहे. फक्त बोर्ड ऑफ डायरेक्टर्स नव्हेत तर सर्वांना सहभागी करून घेऊन काम करू अशा मताची यावर्षीची टीम आहे. त्यामुळे सर्वांनी कामात सहभागी होवूया. बुलेटीन हे तर क्लबचं मुखपत्र! ते याला अपवाद कसं असेल. त्यातही आपल्या परीनं सर्वांनी सहभागी व्हावं असं आवाहन आम्ही करत आहोत. बुलेटिनमधील या सहभागासाठी खास नाविन्यपूर्ण अशा नव्या योजना येत राहतील. शक्य तितक्या मेंबर्सची ओळख त्यांच्या वाढदिवसाच्या आठवड्यामध्ये मुलाखती व चारोळी द्वारे बुलेटीनमध्ये करून देण्याचा प्रयत्न राहील. त्याला आपला प्रतिसाद आवश्यक आहे. बुलेटिन केवळ मेंबर्सनी नव्हे तर त्यांच्या सर्व कुटुंबियांनी वाचावं, त्यात सहभागी व्हावं असंच राहील याची आम्ही काळजी घेऊ. सर्व कुटुंबियांचा त्याला प्रतिसाद हवा. आपल्या कुटुंबात घडलेली एखादी आनंदवार्ता, सर्वांपर्यंत पोहोचावी म्हणून आम्हांला सत्वर कळवा. अगदी जागा देणे/घेणे, गाडी विकणे, खरेदी करणे अशा छोट्या जाहीरातीही आवश्यक तर आपण आपल्या बुलेटिनला नाममात्र दरात देऊ शकता.

विविध मेंबर्सच्या मुलाखती, आपण यांना ओळखता का? Know More Rotary अशा विविध सदरांसोबत अनेक विषयांवरची अगदी थोडक्यात पण महत्त्वाची माहिती नियमितपणे देण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत. रोटरी हेरॉल्ड सर्व समावेशक होईल याची काळजी आम्ही घेऊच. नाविन्यपूर्ण कल्पनांसह आपलीही त्याला साथ हवीय. नव्या बुलेटिनमधला बदल आपणाला जाणवला असेलच ! आपल्या प्रतिक्रिया आम्हांला जरूर कळवा.

चला तर ५३ आठवड्यांचा हा प्रवासाची सुरूवात करूया .......

रोटरी नववर्षाच्या सर्व सभासदांना हार्दिक शुभेच्छा !

## मागील मिटिंगचा रिपोर्ट


आपली पहिली मिटिंग रोटरी नववर्षाच्या पहिल्याच दिवशी म्हणजे एक जुलै रोजी उत्साही वातावरणात संपन्न झाली. पहिल्याच दिवशी ब्लड डोनेशन शिबिरे घेतली गेली त्यासाठी सहभागी सर्वांचे प्रेसिडेंट रो .प्रदीप पासमल यांनी आभार मानले. त्यानंतर नवे मेंबर श्रेयस चौगुले,रोहित देसाई व निखिल महाजन यांचे त्यांनी स्वागत केले. त्यांनी स्वतःची ओळख करून दिली. त्यानंतर आपल्या पहिल्या मिटिंगचे वक्ते डॉ. उन्मेष पनवेलकर, मुंबई यांचे त्यांनी स्वागत केले. त्यांची ओळख रो. उपेंद्र देऊसकर यांनी करून दिली. मिटिंगचा विषय होता लाइफस्टाईल मॉडिफिकेशन टू रिमेन हेल्दी ते स्वतः आयुर्वेदिक डॉक्टर असून त्यांनी डाएट ,झोप व व्यायाम या तीन गोष्टींवर आपले आरोग्यदायी जीवन अवलंबून असते व त्यातील समन्वय हा सर्वात महत्त्वाचा असतो हे उदाहरणांसह सोप्या भाषेत समजावून सांगितले त्यानंतरच्या प्रश्नोत्तरानंतर रो.डॉ. दिलीप शहा यांनी आभार प्रदर्शन केले तर पहिल्याच मिटींगचे लकी रोटेरियन ठरले रो. अमित माटे.


***रोटरी हेरॉल्डला आमच्या हार्दिक शुभेच्छा.. रो.विजय व्हटकर***

ATHARV HOTEL

www.hotelatharv.com

REINVENT LUXURY COMFORT



AC ROOMS



VEG, NON-VEG RESTAURANT



BANQUET HALL

KOLHAPUR KITCHEN

DAKHAN DARBAR

"Takshshila CBS", Near Dabholkar Corner, Kolhapur. Contact : 0231-2525090 / 2520090 / 9607799090 / 9607749090.

# मेंबर सविस्तर !शुभेच्छा निरंतर ..



रो. हरीश हमलाई

रो. हरीश चा जन्म कोल्हापूरचा. शिक्षण केमिस्ट्री मधील ग्रॅज्युएट. माझा त्याचा अनेक वर्षांचा परिचय आहे पण या मुलाखती निमित्ताने आज माझी आणि त्याची व्यावसायिक ओळख झाली. त्याचा मोबाईल टॉवर उभारणी आणि मेंटेनन्स चा व्यवसाय २००८ पासून तो पहात असून संपूर्ण पश्चिम महाराष्ट्र म्हणजे सातारा सांगली सोलापूर रत्नागिरी सिंधुदुर्ग पासून पूर्ण गोवा राज्यातील सर्व मोबाईल टॉवर्स ची उभारणी व मेंटेनन्स चे काम त्याच्याकडे आहे. हे काम ३६५ दिवस व २४ तासांचे असून ते सोपे नाही. आपणा सर्वांचे मोबाईल बंद पडू न देणे व त्यासाठी सातत्याने सर्व टॉवर्स चा मेंटेनन्स उत्तम ठेवणे हे काम तो करतो. या कामासाठी इंडस टॉवर्स लिमिटेड या कंपनीची फ्रँचाईजी त्याच्याकडे असून उत्तम कामासाठी त्याने २०१० व २०१४ मध्ये भारतातील सर्वोत्तम दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार मिळवला असून २०१९ मध्ये एअरटेलचे राजन भारती मित्तल यांच्या हस्ते देखील त्याने पुरस्कार मिळवला आहे. रो. प्रदीप कारंडे यांनी त्याला क्लब मध्ये आणले असून गेली सात आठ वर्षे तो क्लब मध्ये कार्यरत आहे त्याची पत्नी सपना ब्लूमिंग बड्स या शाळेत कामकाज पाहत असून मुले वेदांत हा कॅनडामध्ये तर रिषी हा मुंबईत स्थायिक झाला असून फायनान्स मध्ये दोघांनीही करिअर केले आहे. यासोबत एचपी लॅपटॉप च्या ॲक्सेसरीचे व महिंद्रा जनरेटर डीलरशिप चे काम देखील हरिश सांभाळतो दोन जुलै रोजी होणाऱ्या त्याच्या वाढदिवसानिमित्त रोटरी हेरॉल्ड च्या त्याला हार्दिक शुभेच्छा!

हरीश सपना ची गगनचुंबी नजर
साताऱ्या पासून गोव्याच्या इंडस टॉवरवर
एचपी ॲक्सेसरी पासून महिंद्रा जनरेटर
वेदांत ऋषी सह सर्वांसाठी शुभेच्छा निरंतर...



रो. भारत खराटे

चाटे स्कूल व क्लासेस ग्रुप कोल्हापूरचे सर्वेसर्वा म्हणजे आपल्या क्लबचे मेंबर भारत खराटे. त्यांचा जन्म आणि प्राथमिक शिक्षण भोगजी गाव ता. कळंब जि. धाराशिव इथला . माध्यमिक शिक्षण बार्शी व कळंब येथील. अकरावी ते कॉलेजपर्यंतचे शिक्षण संभाजीनगर येथे झाले .१९९३ ला ग्रॅज्युएशन झाल्यानंतर ते संभाजी-नगरच्या चाटे ग्रुप मध्ये अर्न अँड लर्न पध्दतीने १९९६ पर्यंत राहिले. त्यानंतर ग्रुपच्या एक्सपान्शन च्या माध्यमातून ते नागपूर जळगाव पासून मुंबई पुणे पर्यंत सर्वत्र फिरल्यानंतर १९९७ मध्ये कोल्हापुरात स्थायिक झाले व सध्या कोल्हापूर सांगली सातारा सोलापूर रत्नागिरी सिंधुदुर्ग व बेळगाव हे त्यांचे कार्यक्षेत्र आहे. १९९८ ला त्यांचे लग्न डॉक्टर राजश्री यांचे सोबत झाले. सध्या त्या चाटे ग्रुपमध्येच ॲडमिनिस्ट्रेशन ची जबाबदारी पार पाडत आहेत. त्यांना दोन मुले डॉ. निरांत व मुलगी डॉ. अनुज्ञा व जावई डॉक्टर रितेश कुमार देखील एमबीबीएस डॉक्टर आहे. रो. जेठाभाई पटेल प्रेसिडेंट असताना ते आपल्या क्लब मध्ये जॉईन झाले. काही डायरेक्टर पदांच्या जबाबदाऱ्या पार पाडून रो. सुभाष कुत्ते प्रेसिडेंट असताना सेक्रेटरी पदाची महत्त्वपूर्ण जबाबदारी त्यांनी पार पाडली आहे. त्यांच्या इन्स्टिट्यूट मध्ये त्यांनी इंटरॅक्ट व रोटरॅक्ट क्लब ची स्थापना देखील केली आहे. ज्ञान मंदिर व संस्था केंद्र काढण्याचा त्यांचा मानस असून सुमारे १०० सरकारी शाळात जीवन शिक्षण देता यावे व रोटरी क्लबच्या माध्यमातून ते व्हावे असे त्यांचे स्वप्न आहे. हे त्यांचे स्वप्न पूर्ण व्हावे या दि . ५ जुलै रोजीच्या त्यांच्या वाढदिवसानिमित्त रोटरी हेरॉल्ड व आमच्या हार्दिक शुभेच्छा!

मुलांच्या जीवनात जरी असतील काटे
शिक्षणातून फुले फुलवितात चाटे
डॉ.राजश्री,अनुज्ञा व निरांत म्हणजे विद्येचे साठे
शुभेच्छा सर्वांसह रो. भारत खराटे



रो. विजय व्हटकर

रो. विजय चा जन्म व नेहमीचे शिक्षण कोल्हापुरातच झाले तर लेदर टेक्नॉलॉजी चे शिक्षण त्याने मुंबईतून घेतले. त्याचे वडील ही आपल्या क्लबचे मेंबर होते. तो मल्टिपल व्यावसायिक आहे. सर्वप्रथम त्यांची लेदर इंडस्ट्री कोल्हापुरात होती आता रानीपेट ,तामिळनाडू येथे कॉन्ट्रॅक्ट बेसिसवर तो लेदर इंडस्ट्रीजचे काम चालवतो. इचलकरंजी येथे जवाहर साखर कारखान्याजवळ त्याचा पेट्रोल पंप आहे. व सर्वात महत्त्वाचे म्हणजे २०१८ पासून दाभोळकर कॉर्नर जवळ हॉटेल अथर्व हे लॉजिंग व रेस्टॉरंट त्याने सुरू केले आहे. रो. राजू देशिंगे अध्यक्ष असताना डॉ. संजय उपाध्ये यांनी त्याला रोटरी मध्ये आणले. त्याची पत्नी अश्विनी आर के नगर येथे प्री प्रायमरी स्कूल चालवते. तर मुलगा अनिकेत बारावी कॉमर्सला शिकतो आहे . आंबा येथे त्यांनी जागा घेतली असून तेथे मोठा रिसॉर्ट उभा करण्याचे त्याचे स्वप्न आहे. या स्वप्नासाठी व दि. ७ जुलै रोजीच्या त्याच्या वाढदिवसानिमित्त आमच्या शुभेच्छा त्यांच्यासोबत नेहमीच असतील.

अश्विनी अनिकेत सोबत प्रगती होवो निरंतर
अथर्व लॉज रेस्टॉरंट चे यश धुरंधर
अंबा रिसॉर्ट ची स्वप्नपूर्ती व्हावी खरोखर
रोटरी हेरॉल्ड च्या शुभेच्छा रो.विजय व्हटकर

## HAPPY BIRTHDAY

| | |
|---|---|
| Rtn. Bharat Kharate | 05 July |
| Rtn. Vijay Vhatkar | 07 July |
| Rtn. Chintan Shah | 08 JUly |
| Rtn. Satish Raibage | 10 July |
| Rtn. Narendra Bansal | 12 July |

## HAPPY ANNIVERSARY

| | |
|---|---|
| Rtn. Dhaval Gala & Ann Shweta | 07 July |
| Rtn. Dr. Vinayak Rayakar & Ann Mahima | 10 July |
| Rtn. Pradeep Karande & Ann Manjiri | 10 July |

## Next Meeting :

**Club Installation Ceremony**
at the auspicious hands of
**PRID.A.S.Venkatesh (Venky)**
Trustee,The Rotary Foundation (2026-30)
*In the presence of*
**Rtn.Adv.Abhaysinh Bichkar**
Assisant Governor 2026-27
**Rtn.Harshwardhan Taywade-Patil**
Assistant Governor 2025-26
**Venue: Rotary Samaj Seva Kendra,Nagala Park**
**Date : Thursday 9th July at 6.30 p.m.**

**Upcoming Projects & Events**

| | |
|---|---|
| New Member Orientation Program 7 July | RSSK |
| Tree Plantation 12 July | 5 Star MIDC |
| Rotakid's Installation 12 July | RSSK |

# Club/District Activities:

**PELS SELS and Grants Seminar- 1 March 2026 :** The incoming President and Secretary of our club attended the PELS SELS and Grants Seminar at Goa, on 1st March 2027, at V S Salgaonkar Institute, Goa.

**DLA & DTLS-2 - 25 April 2026:** Our Club members attended the District Learning Assembly and District Team Learning Seminar - 2 on 25th April 2026, at V S Salgaonkar Institute, Goa. Total of 25 members from our club attended the district event.

**Rtn. Pradeep Pasmal got selected as the Rotary Kolhapur Movement President-29 May 2026 :** Congratulations to Rtn. Pradeep Pasmal for being elected as the President of Rotary Kolhapur Movement for the year 2026-27.

**Attended RC Horizone Installation of 19 June 2026**

**Attended RC Kolhapur Central Installation-20 June 2026 :** Rtn. Pradeep Pasmal attended the installation ceremony of Rotary Club of Kolhapur Cental on 20th June

**Attended RC Kolhapur Karveer Installation-20 June 2026 :** Rtn. Pradeep Pasmal attended the installation ceremony of Rotary Club of Kolhapur Karveer on 20th June

**Attended Probus Club Installation-21 June 2026 :** Rtn. Pradeep Pasmal & Rtn. Harshad Dhale attended the installation ceremony of our Probus Club on 21st June. President Rtn. Pradeep was the installing officer. Rtn. Dr. Deelip Shah was present for the occasion.

**Joint Board Meeting-24 June 2026 :** Our Club held the Joint Board meeting of Board members for the year 2025-27 and year 2026-27 on 24th June 2026, where the incoming President Rtn. Pradeep Pasmal shared his vision for the next year, and announced the new board of directors and committee members, along with the club dues collection status.

**BOD Traning-25 June 2026 :** Our club organized a training program Sankalp - Training of Board Members on 25th June 2026, where trainers, Rtn. Amit Mate, Rtn. Siddharth Patankar, Rtn. Arvind Krishnan, PDG Pratap Puranik trained the board of directors of the club in Club Legacy, Inspiring Future Leaders, Serving Beyond Self, District and TRF Opportunities and Governor's Vision, Our Committment. 16 members of the Board attended the training.

**Attended RC Sunrise Installation-27 June 2026:** Rtn. Pradeep Pasmal attended the installation ceremony of Rotary Club of Kolhapur Sunrise on 27th June

**Attended RC Kolhapur City Installation-28 June 2026 :** Rtn. Pradeep Pasmal & Rtn. Harshad Dhale attended the installation ceremony of Rotary Club of Kolhapur City on 28th June

**Blood Donation Camp-1 July 2026:** Our club, in association with the Rotary Kolhapur Movement, organized a Blood Donation Camp on 1st July 2026, at Rotary Samaj Seva Kendra, where we collected 70+ pints of blood.

## THE 4-WAY TEST:

**Of the things we think, say or do,**
Is it the **Truth**? Is it **FAIR** to all concerned?
Will it build **GOODWILL** & **BETTER FRIENDSHIPS**?
Will it be **BENEFICIAL** to all concerned?

We meet every **WEDNESDAY 5:30PM** at
**ROTARY SAMAJ SEVA KENDRA**
Madhavprasad Goenka Bhavan, Collector Office Road,
Nagala Park, Kolhapur 416 003